रूरल फाउंडेशन नंदुरबार संचालित,

# वरिष्ठ विज्ञान महाविद्यालय अक्कलकुवा जि. नंदुरबार

# वार्षिक अहवाल २०१९-२०

सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पत्रानुसार विविध उपक्रम राबविण्यात आले असून त्यांचा सविस्तर रित्या वार्षिक अहवाल सादर करीत आहोत.

सन २०१८-१९ पासून प्रा. डॉ मनोज धोंडबाजी मुधोळकर यांची महाविद्यालयाने विद्यार्थी विकास अधिकारी म्हणून निवड केली व विद्यापीठाच्या संमती पत्रानुसार मागील वर्षाप्रमाणे यावर्षी सुद्धा विद्यार्थी विकास विभाग अंतर्गत विविध कार्यक्रम घेण्यात आले

महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभागाने विद्यापीठा मार्फ़त आयोजित केलेली कार्यक्रमाचे आयोजकत्व स्वीकारण्यासाठी आलेल्या पत्रानुसार वेगवेगळे उपक्रम घेण्यासाठी परवानगी प्रस्ताव विद्यापिठाकडे सादर केला यात,

१) युवतीसभा अंतर्गत विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा

२) युवतीसभा अंतर्गत स्वयंसिद्धा प्रशिक्षण कार्यशाळा

संदर्भ:- जा.क्र.उमवि/१४/विवि-१९/१९३/२०१९ दि. २३/०७/२०१९

दि.१/०७/२०१९ रोजी वृक्षारोपण कार्यक्रम राज्य शासनाकडून राबविण्यात यावा असे सांगण्यात आले होते त्या दिवशी महाविद्यालयाच्या परिसरात एन.एस.एस. एकक आणि विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने सक्रीय सहभाग घेण्यात येउन विविध प्रकारची ५० वृक्षाची रोपे महाविद्यालयाच्या परिसरात लावण्यात आली .

दि. ९/८/२०१९ रोजी जागतिक आदिवासी दिवस साजरा केला ह्या दिवशी याहामोगी माता आणि वीर बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून सर्व महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते

दि. १४/१०/२०१९ रोजी विद्यार्थी वैद्यकीय तपासणी घेण्यात आली या करीता डॉ भूषण कुलकर्णी हे उपस्थित होते

दि. १४/१०/२०१९ रोजी आर्थिक दुर्बल घटक योजनेतील विद्यार्थी नावे विद्यापीठात पाठविण्यात आली

दि. ३१/१०/२०१९ रोजी भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करण्यात आली त्यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून एकतेची शपथ घेण्यात आली.

दि. १९/१२/२०१९ या दिवशी विद्यापीठाने टाकलेल्या जिल्हा स्तरीय युवारंग बाबत ची माहिती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देण्यात आली

दि. ०६/०१/२०२० या दिवशी विद्यापीठाने टाकलेल्या जिल्हा स्तरीय युवारंग ची नोंदणी तारीख पुढे ढकललेली व नविन तारीख बाबत माहिती देण्यात आली माहिती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देण्यात आली जेणे करून आणखी काही स्पर्धा प्रवेश करता येतील

दि. ०३/०१/२०२० रोजी क्रांतिज्योति सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली.

दि. १२/०१/२०२० रोजी स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली या दिवशी त्यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून प्राचार्य बी. एन. पाटील सर यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयी मार्गदर्शन केले.

दि. १६/०१/२०२० ते २०/०१/२०२० दरम्यान कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव च्या विद्यार्थी विकास विभागातर्फे पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शहादा जि. नंदुरबार येथे आयोजित झालेल्या विद्यापीठ स्तरीय युवारंग स्पर्धेत महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांनी स्पॉट पेंटिंग, कोलाज, रांगोळी, कार्टूनिंग, मेहंदी, फोटोग्राफी, काव्यवाचन, इन्स्टालेशन या स्पर्धेत सहभाग नोंदविला

दि.३०/०१/२०२० ते ०६/०२/२०२० दरम्यान विद्यापीठ स्तरीय युवतीसभा अंतर्गत स्वयंसिद्धा प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले यात महाविद्यालयातील सर्व मुलींनी सहभाग नोंदविला या कार्यशाळेमध्ये मुलींना स्व संरक्षण साठीचे प्रशिक्षण देण्यात आले यासाठी कु. वर्षा भरत रहासे, नंदुरबार जिल्हा स्वयंसिद्धा प्रमुख ह्यांनी मुलींना ८ दिवस स्व संरक्षण साठी जुडो-कराटे चे प्रशिक्षण दिले.

०३/०२/२०२० रोजी विद्यार्थी विकास विभागातर्फे आयोजित स्पर्धा परीक्षा या विषयांतर्गत सेट, नेट परीक्षा कशाप्रकारे उत्तीर्ण करायची याचे मार्गदर्शन जे.आर.एफ. नेट उत्तीर्ण कु. योगिता वसावे हिने विद्यार्थ्यांना दिले

दि. १८/०२/२०२० रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ च्या विद्यार्थी विकास विभाग च्या संयुक्त विद्यामानाने महाविद्यालयात विद्यापीठ स्तरीय एक दिवसीय ‘युवतीसभा अंतर्गत विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा’ घेण्यात आली यात विविध पाच महाविद्यालयातील विद्यार्थिनिनी सहभाग नोंदविला या कार्यशाळेसाठी विविध मान्यवरांनी मार्गदर्शन केलेत यात कु. वर्षा भरत रहासे नंदुरबार जिल्हा जुडो-कराटे प्रशिक्षक, यांनी ‘महिला आरोग्य, ‘पाळी माझी सहेली’ या विषयावर मार्गदर्शन केले. श्री प्रा. विजय पंडित सूर्यवंशी, सहाय्यक प्राध्यापक(राज्यशास्त्र), जिजामाता कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय नंदुरबार ‘व्यक्तिमत्व विकास’ या विषयावर मार्गदर्शन केले त्यांनी मुलींना कशाप्रकारे आपण स्वतः चा विकास स्वतः करू शकतो या बाबत सांगितले श्रीमती योगिता ज्ञानेश्वर चौधरी प्राचार्या, शिक्षणशास्त्र महिला महाविदयालय, अक्कलकुवा जि. नंदुरबार यांनी मुलींना त्यांच्या व्यक्तिमत्व विकास कसे करता येईल यावर मार्गदर्शन केले मुलींनी स्वावलंबी होणे आजच्या जगतात फार महत्वाचे आहे. जेणे करून त्यांना इतरांसमोर मान उंच करून जगता येईल. नंतर श्रीमती मीना मनोज बैसाणे, प्राचार्या, अध्यापक महाविदयालय अक्कलकुवा यांनी मुलींना व्यक्तिमत्व विकास यावर मार्गदर्शन केले.

दि. ०३/०३/२०२० ते ०४/०३/२०२० या दरम्यान कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव च्या विद्यार्थी विकास विभाग आणि शिक्षणशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवशीय आदिवासी विद्यार्थी आत्मविश्वास व प्रेरणा विकास कार्यशाळेमध्ये ३ मुले व ३ मुलींनी या कार्यशाळेत पाठविण्यात आले व त्यांनी यात सक्रीय सहभाग नोंदविला.